**प्रेसनोट**

ठिकाण :– वाणगाव, जि.पालघर
दिनांक – २९/०६/२०१८

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे (कॅम्प पालघर) |
| २ | लोकसेवकाचे नाव पद व नेमणुकीचे ठिकाण | सुधिर इच्छाराम वाघ, वय – ५६ वर्षे, पोलीस उप निरीक्षक, वाणगाव पोलीस स्टेशन, जि.पालघर राहणार – सावलीया पार्क, बी–२०४, जी.सी.सी. रोड, मिरारोड पश्चिम, ता.जि.ठाणे |
| ३ | अपराध घडला तारीख वेळ व ठिकाण | दिनांक २९/०६/२०१८ रोजी १७:४० वाजताच्या सुमारास बीएसएनएल कार्यालय वाणगाव पुर्व चे मेनगेट समोर. |
| ४ | मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/– रुपये |
| ५ | स्विकारलेली लाचेची रक्कम | ५,०००/– रुपये |

यातील आरोपी लोकसेवक हे येथे वाणगाव पोलीस स्टेशन, जि.पालघर येथे पोलीस उप निरीक्षक या पदावर काम करतात. तक्रारदार यांचा आतेभाउ यांचेविरुध्द वाणगाव पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयामध्ये तक्रारदार यांचे आतेभाउ यांनी तक्रारदार यांची मोटरसायकल वापरली असल्याने ती आरोपी लोकसेवक यांनी जप्त केलेली आहे. सदरच्या जप्त केलेल्या गाडीबाबत तक्रारदार यांनी लोकसेवकांना विचारणा केली असता, त्यांनी तक्रारदार यांना सांगीतले की, १०,०००/– रुपये (दहा हजार रुपये) दयावे लागतील नाहीतर गाडी अशीच पोलीस स्टेशनला सडून जाईल असे म्हणून तक्रारदार श्री.धोडी यांची गाडी सोडण्यासाठी त्यांचेकडे लाचेची मागणी केलेली आहे. अशा आशयाची लेखी तक्रार अँन्टी करप्शन ब्युरो, पालघर याचे नावे दिनांक १८/०६/२०१८ रोजी तक्रारदार यांनी दिली.

सदर तकारीच्या अनुषगाने पंच साक्षीदारां समक्ष दिनांक १८/०६/२०१८ व दिनांक २०/०६/२०१८ रोजी पडताळणी केली असता लोकसेवक यांनी तक्रारदार यांची गुन्हयात जप्त केलेली मोटर सायकल सोडण्यासाठी ५,०००/– रुपये लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे पडताळणीमध्ये निष्पन्न झाले.

त्या अनुषंगाने दिनांक २९/०६/२०१८ रोजी पंच साक्षीदारां समक्ष लाचेचा सापळा आजमाविला असता, वर नमुद घटनास्थळी नमुद आलोसे यांना तक्रारदार यांचेकडून ५,०००/– रूपये लाचेच्या रक्कमेचा स्विकार केल्याने पकडण्यात आले. सदर गुन्हयाचा पुढील तपास आम्ही करीत आहोत.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे (कॅम्प पालघर) कार्यालयास आपात्कालीन क्र. १०६४ तसेच दुरध्वनी क्र. ०२५२५–२९७२९७ यावर संपर्क साधण्याचे आवाहन याद्वारे करण्यात येत आहे.

(महेंद्र वाघमारे)
पोलीस निरीक्षक
अेसीबी, ठाणे (कॅम्प पालघर)
मोबाईल क्रमांक ९९६७९९३८९३